# तलत मेहमूद - भाग ३



मेहंदी हसन, जगजितसिंग आणि राजेंद्र मेहता सारखे दिग्गज गझल गायकही त्याच्या गायनशैलीला वंद्य मानतात. गझल स्पेशालिस्ट मदन मोहन ह्यांनी तलतचे हे कसब ओळखून त्यांना 'जहानआरा'ची गाणी देण्याचे ठरविले. खरं तर निर्मात्यांला महंमद रफीच हवा होता. परंतु तलतच त्या गाण्यांना योग्य तो न्याय देईल असे मदन मोहन यांना वाटले आणि ते खरे ठरले. चित्रपट जबरदस्त आपटला पण मदन मोहन आणि पर्यायाने तलत पुरेपूर यशस्वी झाले. खरे तर इतके सुंदर संगीत देखील ते तो पडेल चित्रपट वाचवू शकले नाही. त्यामुळे, जरी 'जहानआरा' चित्रपट विस्मृतीत गेला तरी रसिक आजही त्याची गाणी विसरू शकले नाहीत.

तलतच्या बाबतीत म्हणाल तर 'जहानआरा' चित्रपट त्याच्या चित्रपट कारकीर्दीची अखेर जवळ आली असे दाखवणारा जणू संदेशच घेऊन आला असे म्हणायला हरकत नाही. ह्याची त्याला पुसटशी शंका यावी असे काही प्रकारही ह्या अगोदर घडून गेले होते. चित्रपटसृष्टीतील नियत बदलत होती. त्याने रेकॉर्ड केलेली गाणी चित्रपटात घेतली जात नव्हती. उदा. चित्रगुप्तासाठी त्याने 'भाभी' मध्ये 'चल उड जा रे पंछी' हे गाणे रेकॉर्ड केले होते. परंतु त्याच्या ऐवजी रफीला घेण्यात आले. नंतर 'आदमी' मध्येही रफीसोबतच्या द्वंद्वगीतात त्याच्या ऐवजी महेंद्र कपूरला घेण्यात आले. 'कैसी हँसी आज बहारोंकी रात है' ह्या साठी मनोज कुमारला त्याच्या ऐवजी महेंद्र कपूरच हवा होता. अशा रीतीने

चित्रपटाबाहेर रफी आणि तलत तर चित्रपटाच्या आत रफी आणि महेंद्र कपूरच आढळले.

’जहानआरा’चे अपयश पचवणे तलतला फार जड गेले. केले ’तेरे आँखके आँसू पी जाऊ’ सारखे गाणे देऊनही यापेक्षा रसिकांची आणखी काय अपेक्षा होती ते त्याला उमगले नाही. मदन मोहनचाही ऱ्हास सुरू झाला. तलत खूपच दु:खी झाला. आता संगीतालाही फार कर्कशपणा येऊ लागला होता. त्यामुळे त्याने हे सारे सहजपणे सोडून दिले.

१९९० मध्ये मीना खुरांना हिने एका मुलाखतीत तलतला त्याने पार्श्वगायन का सोडून दिले असा प्रश्न विचारला होता. तेव्हा तलत म्हणाला, चित्रपट संगीत आता आमूलाग्र बदलले होते. प्रेमाचा हळूवारपणा जाऊन त्याची जागा हिंसेने घेतली होती. वेस्टर्न पॉपने सूर तालाची जागा घेतली. डिस्कोथेक मध्ये तुम्हाला सौंदर्य आणि डौल दाखवता येणार नाही. नेहमीचा वहिवाटीचा मार्ग बदलून संगीताने एक वेगळेच वळण घेतले होते. हे सारे एकदम अचानकच घडून आले आणि मी फार गोंधळून गेलो. अशा बदललेल्या वातावरणात माझ्यासारखा संस्कारित माणूस कुठेही बसू शकत नव्हता.

’जहानआरा’नंतर बरीच वर्षे त्याने चित्रपटाव्यतिरिक्त गझल आणि गीते आपल्या रसिक श्रोत्यांना त्याच्या भावपूर्ण स्वरांत ऐकवली. शेवटी गोळाबेरीज केली असतां तलतने चित्रपटांत किंवा त्याव्यतिरिक्त इतर सर्व भाषांमध्ये ७४७ गाणी म्हटली. आणि आश्चर्य म्हणजे बहुतेक सर्व गाण्यांनी लोकप्रियतेचा कळस गाठला. दिग्गज संगीतकार कल्याणजींच्या मते तलत सर्वांत लोकप्रिय असा गायक होता कारण त्याचे जवळजवळ प्रत्येक गाणे लोकप्रिय झाले.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com